अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या
वस्तींचा विकास करणे
( दलित वस्ती सुधार योजना)

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय,क्रमांकः-दवसु-२०१३/प्र.क्र. ८५/अजाक-१**

**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक :- १ ऑगस्ट, २०१३**

वाचा:- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक,दिनांक ५/१२/२०११
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक-१,दिनांक ३१/१२/२०११
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक-१,दिनांक २/७/२०१२
४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक-१,दिनांक २०/१२/२०१२

प्रस्तावना:- दलित वस्ती सुधार योजना या योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण व शहरी भागातील दलित वस्त्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या लोकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक दलित वस्तीला सन १९९९ पासून अनुदान देण्यात येते. सदर अनुदानात वेळोवेळी वाढ करण्यात आली आहे. संदर्भाधीन क्रमांक १ वरील शासन निर्णय, दिनांक ५/१२/२०११ अन्वये ग्रामीण दलित वस्त्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेत लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ करण्यात आली असून योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात आली आहेत. प्रस्तुत योजनेंतर्गत ग्रामीण दलित वस्तीअंतर्गत करावयाच्या कामांची निवड करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीस प्रदान करण्यात आले आहेत. त्यानंतर शासन शुद्धीपत्रक, दिनांक ३१.१२.२०११, दिनांक २.७.२०१२ व दिनांक २०.१२.२०१२ अन्वये ग्रामीण दलित वस्तीअंतर्गत करावयाच्या कामांची निवड करण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील व सभापती, समाजकल्याण यांच्या सहअध्यक्षतेखालील समितीस प्रदान करण्यात आलेले आहेत.

तसेच ग्रामीण दलित वस्तीमधील करावयाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिनियमानुसार प्रदान केले आहेत.



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

शासन निर्णय, दिनांक १४/११/२००८ व शासन शुद्धीपत्रक १९/१२/२००८ मध्ये नमूद तरतूदीप्रमाणे सर्व जिल्हयात बृहत आराखडा (Master Plan) तयार करुन ग्रामीण दलित वस्त्यांमध्ये कामे घेण्यात आली आहेत. तथापि, सदर बृहत आराखडा (Master Plan) सन २००१ च्या जनगणनेनुसार २००८-२००९ मध्ये बनविण्यात आला असून, त्यास ५ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी प्रकाशित करण्यात आली आहे. त्यामुळे या नवीन लोकसंख्येच्याआधारे ग्रामीण दलित वस्त्यांमधील विकास कामांचा बृहत आराखडा (Master Plan) नव्याने तयार करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन, दलित वस्ती घोषित करणे, बृहत आराखडा तयार करणे तसेच दलित वस्त्यांची तपासणी इ. बाबत सूचना निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:- अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तींचा विकास करणे (ग्रामीण) (पूर्वीचे नाव दलित वस्ती सुधार योजना) या योजनेतंर्गत सन २०११ च्या जनगणनेनुसार घोषित केलेल्या लोकसंख्येच्याआधारे दलित वस्ती घोषित करणे, बृहत आराखडा तयार करणे तसेच दलित वस्त्यांची तपासणी इ. बाबत पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

| | | |
|---|---|---|
| १ | दलित वस्ती घोषित करणे | - अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील लोकसंख्येची मोजणी करताना जनगणनेच्या निकषाबरोबर या वस्तीमध्ये असलेली प्रत्यक्ष लोकसंख्या लक्षात घेऊन, त्याप्रमाणे ग्राम सभेने ठराव पारित करावा व तो ग्राम पंचायतीकडे पाठवावा. ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या ठरावांचा संकलित प्रस्ताव गटविकास अधिका-यांनी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दलित वस्त्यांची घोषणा करावी.<br>- संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सर्व घोषित केलेल्या दलित वस्त्यांना स्वतंत्र सांकेतांक देऊन यादी तयार करावी.<br>- दलित वस्तीला स्वतंत्र सांकेतांक देताना परिशिष्ट अ मधील जिल्हा व तालुक्याच्या यादीतील सांकेतांक देऊन दलित वस्तीचा क्रमांक पुढे जोडावा.<br>उदा. जिल्हा ठाणे, तालुका वसईमधील एका गावातील 'आंबेडकरनगर' या दलित वस्तीचा '०००१' असा क्रमांक असेल तर आंबेडकरनगर या दलित वस्तीचा सांकेतांक '०३-००२-०००१' असा असेल. (जिल्हयाचा सांकेतांक दोन अंकी, तालुक्याचा सांकेतांक तीन अंकी व दलित वस्तीचा सांकेतांक प्रत्येकी चार अंकी असावा.)<br>- सदर घोषित दलित वस्त्यांची यादी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी व आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना माहितीसाठी सादर कराव्यात. |
| २ | बृहत आराखडा तयार करणे | - दलित वस्तीची विकास कामे घेण्यापूर्वी त्या वस्तीचा विकास कामनिहाय बृहत आराखडा (Master Plan) तयार करावा. बृहत आराखडयामध्ये (Master Plan) घोषित केलेल्या दलित वस्त्यांमध्ये कामे हाती घेताना ती पुढील प्राधान्यक्रमाने हाती घेण्यात यावीत:-<br>i) पाणीपुरवठा<br>ii) मलनि:स्सारण<br>iii) पोहोच रस्ते |



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | iv) अंतर्गत रस्ते<br>v) वीजपुरवठा व<br>vi) समाजमंदिर<br>वरील प्राधान्यक्रमाने प्रथम काम पूर्ण झाल्याशिवाय दुसरे काम हाती घेऊ नये.<br>- सदर बृहत आराखडा (Master Plan) स्थानिक परिस्थिती व गरजा लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने ठरवावा व तो पंचायत समितीचे कनिष्ठ अभियंता यांनी तयार करावा. पंचायत समिती स्तरावरुन प्राप्त झालेल्या बृहत आराखडयांचे (Master Plan) संकलन करुन जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हयाचा बृहत आराखडा (Master Plan) तयार करावा. सदर संकलित बृहत आराखडयास (Master Plan) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांची मान्यता घ्यावी.<br>- दलित वस्तीतील कामाविषयीची माहिती समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद ला अवगत करणे आवश्यक असल्याने घोषित दलित वस्त्यांची यादी व विकास कामनिहाय संकलित बृहत आराखडा (Master Plan) समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद ला माहितीसाठी सादर करावा.<br>- बृहत आराखडा (Master Plan) ५ वर्षासाठी असेल. दर ५ वर्षानंतर नवीन बृहत आराखडा (Master Plan) तयार करण्यात यावा.<br>त्याबरोबर सर्व घोषित दलित वस्त्यांचे GIS Mapping करावे व त्यांचा Electronic Data Base तयार करुन तो संबंधित जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर (Website) उपलब्ध करावा. |
| ३ | दलित वस्त्यांची तपासणी | या योजनेंतर्गत होणाऱ्या विकास कामांची अंतर्गत तपासणी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधित अन्य अधिकारी/कर्मचाऱ्यांसमवेत करावी. तसेच प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांनी अन्य जिल्हयातील जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेसमवेत विकास कामांची १००% तपासणी करावी. याव्यतिरिक्त ५% दलित वस्त्यांमधील कामांची तपासणी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत करण्यात यावी. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज.ल. पावरा)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-
आयुक्त, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
महालेखापाल ,(लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षण) महाराष्ट्र-१/२ ,मुंबई/नागपूर
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner